# 2019 20




पुढारी कोल्हापूर, रविवार, २३ जून २०१९

## जागतिक योग दिन

**विवेकानंद कॉलेज**

योगामुळे वजनात घट होते. ताण-तणावापासून मुक्ती मिळते, मन शांत व प्रसन्न राहते व आरोग्य उत्तम बनते. त्यामुळेच निरोगी शरीर व मन प्रसन्न ठेवण्यासाठी योगासने व प्राणायाम आवशयक आहे, असे प्रतिपादन विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी व एनएसएस विभागाच्या वतीने २१ जून रोजी सकाळी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनमध्ये एनएससी व एनएसएसच्या ८० विद्यार्थी व स्टाफने एकत्रितरीत्या योगासने व प्राणायाम केले.

**INTERNATIONAL YOGA DAY**



पुढारी

शनिवार २ मार्च २०१९

## विवेकानंद महाविद्यालयाच्या तीन एनसीसी छात्रांना मुख्यमंत्री शिष्यवृत्ती

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** विवेकानंद महाविद्यालयाच्या तीन एन.सी.सी. छात्रांना एन.सी.सी. कार्यालयाच्या वतीने २०१८ ची मुख्यमंत्री शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. सुजाता पाटील (बी.ए.भाग ३), अर्चना मोरे, प्रतिराज पाटील (दोघे बी.एस्सी. भाग ३) यांचा यात समावेश आहे. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. छात्रांना कोल्हापूर एन.सी. सी. ग्रुपचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर डोग्रा, कर्नल जे. पी. सायकिया, एन. सी. सी. अधिकारी कॅप्टन सुनीता भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

SCHOLORSHIP




पुढारी कोल्हापूर, सोमवार, २५ फेब्रुवारी २०१९

## देशप्रेमाचे ध्येय उराशी बाळगून वाटचाल करा : प्रा. डॉ. होनगेकर

कोल्हापूर (प्रतिनिधी) : एनसीसीच्या माध्यमातून छात्रांना अनेक साहसी शिबिरात सहभागी होण्याची संधी प्राप्त होते. देशप्रेमाचे ध्येय मनाशी बाळगून एनसीसी छात्रांनी भविष्याची वाटचाल करावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विभागातर्फे आयोजित पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी जिमखाना प्रमुख प्रा किरण पाटील होते. याप्रसंगी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय एनसीसी कॅम्प्समध्ये सहभागी झालेल्या व विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या २९ छात्रांचा सत्कार करण्यात आला. देवयानी जोशी हिचा प्रजासत्ताक दिनी संचालनात सहभागी झालेबददल विशेष सत्कार करण्यात आला. सुप्रिया संकपाळ हिने एन.सी.सी.च्या प्रगतीचा आढावा स्लाईड शो द्वारे घेतला. यावेळी पुलवामा येथील अतिरेकी हल्ल्यात शहिद झालेल्या झालेल्या जवानांना श्रध्दांजली वाहण्यात आली. प्रास्ताविक कॅप्टन सुनीता भोसले यांनी केले. सूत्रसंचालन पियुष कुपटे, तृप्ती कुंभार यानी केले. निकिता पाटील यांनी आभार मानले.

**INDIAN INDEPENDENCE DAY**



पुण्य नगरी

शुक्रवार, २ ऑगस्ट २०१९

# आपत्ती व्यवस्थापनाबाबत कार्यशाळा

कोल्हापूर : महापालिका अग्निशमन आणि आपत्ती व्यावस्थापन विभागाने विवेकानंद आणि शाहू दयानंद कॉलेज येथे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा आयोजित केली. यामध्ये स्थानक अधिकारी मनीष रणभिसे यांनी नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्तीविषयी माहिती दिली. यावेळी मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, ओंकार खेडकर, मधुकर जाधव, तानाजी वडर, सुनील यादव, प्रमोद मोरे, सुनील वाईंगडे, विवेकानंद, केएमसी, गोखले कॉलेजचे शिक्षक व एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.

**DIASTER MANAGEMENT**



# महास्वच्छतेत विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरात रविवारी सकाळी सात वाजल्यापासून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेचा हा एकोणीसावा रविवार होता. या अभियानामध्ये विवेकानंद कॉलेज एनसीसी व एनएसएसचे १२५ विद्यार्थी विद्यार्थिनी, कॉमर्स कॉलेजचे ३० विद्यार्थी, विद्यार्थिनी, राजर्षी शाहू कॉलेजचे एनसीसी, एनएसएसचे १०० विद्यार्थी विद्यार्थिनींनी व स्वरा फाऊंडेशनचे २० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला

कोंडा ओळ व कदमवाडी येथे कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज व विवेकानंद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी विद्यार्थिनींना आयुक्त डॉ. कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ दिली. मोहिमेत लक्ष्मीपुरी, कामगार चाळ, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपुरी सहावी गल्ली, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, कदमवाडी या परिसरातील स्वच्छता करण्यात आली.

यावेळी सहा जेसीबी, दहा डंपर व ट्रॅक्टर ट्रॉली, ८१ टिप्पर व महापालिकेच्या २०० सफाई कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने १२० टन कचरा व गाळाचा उठाव करण्यात आला. स्वच्छता केलेनंतर रोगराई पसरू नये, यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या उपस्थितीत झालेल्या या मोहिमेत महापालिका व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

कोल्हापूर : महापालिकेतर्फे रविवारी शहरात स्वच्छता मोहीम झाली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

**CLEANLINESS DRIVE**

**तरुण भारत** ▪ सोमवार, २ सप्टेंबर २०१९

# महाविद्यालयीन विद्यार्थी शहर स्वच्छतेसाठी सरसावले

## १२० टन कचरा, गाळ उठाव : अखंड १९ व्या रविवारी महास्वच्छता



**कोल्हापूर : पूर ओसरलेल्या परिसराची स्वच्छता करताना महाविद्यालयीन विद्यार्थी, सोबत सामाजिक संघटना. शहर स्वच्छतेचा संकल्प केलेल्या मनपा आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छता केली.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महापालिकेच्यावतीने आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या संकल्पनेतून शहरामध्ये दर रविवारी महास्वच्छता अभियान राबविले जात आहे. १९ व्या रविवारी (१ सप्टेंबर) ही मोहीम कायम होती. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीय होता. कॉमर्स, विवेकानंद व शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पूर ओसरल्या परिसराची स्वच्छता केली. दिवसभरामध्ये १२० टन कचरा, गाळ व प्लॅस्टिक गोळा करण्यात आले.

यावेळी कोंडा ओळ व कदमवाडी येथे कॉमर्स कॉलेज, शाहू कॉलेज व विवेकानंद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी विद्यार्थींनी स्वच्छता केली. तत्पुर्वी आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यानी त्यांना स्वच्छतेची शपथ दिली. यानंतर लक्ष्मीपूरी, कामगार चाळ, रिलायन्स मॉल मागे, फोर्ड कॉर्नर, व्हिल्सन पूल, दसरा चौक, संप आणि पंप, पंचगंगा घाट नदी परिसर, कुंभार गल्ली, सुख सागर हॉटेल, शाहूपूरी ६ वी गल्ली, सुतार वाडा, गाडी अड्डा, कोरे हॉस्पिटल, संभाजी पूल परिसर, कदमवाडी या परिसराची स्वच्छता करण्यात आली.

यावेळी ६ जेसीबी, १० डंपर, १० ट्रॅक्टर ट्रॉली, ८१ टिप्पर व महापालिकेच्या २०० सफाई कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. रोगराई पसरु नये यासाठी या परिसरात धूर व औषध फवारणी, ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली. एनसीसी व एनएसएसचे १२५ विद्यार्थी विद्यार्थींनी, कॉमर्स कॉलेजचे ३० विद्यार्थी विद्यार्थींनी, राजर्षी शाहू कॉलेजचे एनसीसी, एनएसएसचे १०० विद्यार्थी विद्यार्थीनींनी व स्वरा फौंडेशनचे २० कार्यकर्ते यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी सहायक आयुक्त संजय सरनाईक, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विजय पाटील यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे, जयवंत पवार, राहुल राजगोळकर, निखिल पाडळकर, उदय गायकवाड, दिलीप देसाई आदी उपस्थित होते.

**CLEANLINESS DRIVE**



लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०१९

पंचगंगा नदी परिसरात एकविसाव्या महास्वच्छता अभियानात रविवारी महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व विविध कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी कलशेट्टी यांनी सहभागींना स्वच्छतेची शपथ दिली.

# महास्वच्छता अभियानाची एकविशी

## विवेकानंद, के.एम.सी., गोखले कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या महास्वच्छता अभियानाचा सलग एकविसावा रविवार असून यात विवेकानंद महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (केएमसी) व गोपालकृष्ण गोखले कॉलेजमधील दोनशेहून अधिक विद्यार्थी व दोनशे महापालिका अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी १३ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले.

विवेकानंद कॉलेजच्या एनएसएसच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ दिली व स्वच्छता मोहिमेस प्रारंभ झाला. जयंती नाला संप व पंप हाऊस, पंचगंगा नदीघाट, रंकाळा तलाव परिसर, रिलायन्स मॉल मागे, कोरे हॉस्पिटल या परिसरात ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यात दोन जे.सी.बी., चार डंपरचा वापर करण्यात आला. रोगराई पसरु नये म्हणून धूर, औषध फवारणी व ब्लिचिंग पावडर टाकण्यात आली.

यावेळी पर्यावरण अभियंता समीर व्याघ्रांबरे, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, निखील पाडळकर, पर्यावरणवादी उदय गायकवाड, दिलीप देसाई, आर्किटेक्ट अँड इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य एस. वाय. होनगेकर, गोखले कॉलेजचे प्राचार्य बी. के. पाटील, के. एम. सी. कॉलेजचे प्राचार्य एस. एम. गवळी, डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, मॉर्निंग वॉकचे सुरेश शहा, उल्का शहा, लता चंदवानी, पूजा भोजवानी, ओमप्रकाश भोजवानी, कीर्ती चव्हाण, गीता हेगडे, शीला पाटील, आरोग्य निरीक्षक शुभांगी पोवार, आदी सहभागी झाले होते.

**JAYANTI NALA CLEANING**

**महासत्ता**

शुक्रवार,ता. ४ ऑक्टोबर २०१९

# प्लॅस्टिकमुक्ती उपक्रमात विद्यार्थ्यांसह नागरीकांचाही सहभाग

कोल्हापूर ता.२ (प्रतिनिधी)

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता हिच सेवा या उपक्रमाअंतर्गत आज सकाळी ७.०० वाजलेपासून शहरात श्रमदान मोहिम राबविण्यात आली.

यावेळी गांधी मैदान, अंबाबाई मंदिर परिसर, बिंदू चौक व पार्किंग परिसर, दसरा चौक पार्किंग परिसर, शाहू समाधी स्थळ, रंकाळा तलाव, टेंबलाईवाडी मंदीर परिसर, जिल्हाधिकारी कार्यालय रोड ते खानविलकर पेट्रोल पंप रस्ता, पंचगंगा घाट, सायबर रोड, पोलिस लाईन, सिध्दार्थनगर, केवीजपार्क, राजर्षी शाहू कृषी विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व महापालिकेच्या सर्व [illegible] या ठिकाणी श्रमदान घेऊन प्लॅस्टिक संकलन करण्यात आले.

या मोहिमेत साधारणतः २ टन प्लॅस्टिक व १० डंपर कचरा गोळा करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब, मगदूम हायस्कूल, खांडेकर शाळा, हास्यक्लब, शहाजी कॉलेज, महावीर कॉलेज, बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्मचारी, कॉमर्स कॉलेज, विवेकानंद कॉलेज एनसीसीचे विद्यार्थी, बालगोपाल तालीम परिसरातील नागरीक, रंकाळा वॉकर्स, रंकाळाप्रेमी ग्रुप, शिलादेवी शिंदे हायस्कूलचे विद्यार्थी, एक हात मैत्रीचा ग्रुपचे सदस्य, महावीर कॉलेजे विद्यार्थी व महापालिकेचे कर्मचाऱ्यांनी या परिसराची स्वच्छता केली. या अंतर्गत आज शहरातील समता हायस्कूल, राजमाता जिजाबाई गर्ल्स हायस्कूल, टेंबाईवाडी विद्यालय, हिंदू स्कूल, शिलादेवी दि शिंदे हायस्कूल, उर्दु स्कूल, मगदूम हायस्कूल, तवनाप्पा पाटने हायस्कूल, प्रायव्हेट हायस्कूल, नेहरुनगर विद्यामंदीर, सेंट रुईया विद्यालय, जरगनगर विद्यामंदीर, सेव्हंथडे इंग्लिश स्कूल, ज्योर्तिलिंग विद्यामंदीर, बागल स्कूल, आहिल्याबाई विद्यामंदीर, भाऊसाहेब महागांवकर विद्यामंदीर, शिवराज विद्यालय, म.दू.श्रेष्ठी स्कूल यांनी आपल्या शाळेच्या परिसरात स्वच्छता मोहिम राबविली.

**PLASTIC FREE KOLHAPUR**



तरुण भारत ▪ शुक्रवार, १० जानेवारी २०२०

## महाविद्यालयांचा स्वच्छ सर्वेक्षणात महत्त्वाचा सहभाग

### आयुक्त डॉ. कलशेट्टी यांचे आवाहन

**कोल्हापूर :** स्वच्छ सर्वेक्षण सन २०२० मध्ये कोल्हापूर शहरातील सर्व महाविद्यालयांचा सहभाग महत्त्वाचा आहे. शहरातील सर्व महाविद्यालयांनी यामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा. महाविद्यालय परिसरातील उद्यानांची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी. तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी आवड निर्माण करण्यात यावी, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

प्राचार्य, एन.सी.सी., एन.एस.एस समन्वयक यांना स्वच्छ सर्वेक्षणबाबत माहिती देण्यासाठी कमला कॉलेजमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

माहिती शिक्षण व संवाद अधिकारी निलेश पोतदार म्हणाले, शहराने स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये सहभाग घेतला आहे. स्पर्धेचे ऑनलाईन सिटीझन फिडबॅक महत्वाचे आहे. यासाठी केंद्र शासनाने वेबसाईट उपलब्ध करुन दिली आहे. तरी शहरातील सर्व नागरिकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व प्राचार्य, शिक्षक यांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन पोतदार यांनी केले.

**PLASTIC FREE KOLHAPUR**



तरुण भारत ▪ सोमवार, २ डिसेंबर २०१९

### स्वामी विवेकानंद महाविद्यालयात व्याख्यान

वैयक्तिक, सामाजिक आरोग्य चांगले राहण्यासाठी विविध रोगांवर मात करून आत्मविश्वासाने जगणे महत्वाचे आहे, असे मत कराड येथील कृष्णा हॉस्पिटलमधील मेडिसीन विभागप्रमुख डॉ. वैशाली राजे यांनी व्यक्त केले. स्वामी विवेकानंद महाविद्यालयात जागतिक एडस् दिनी आयोजित व्याख्यानात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

डॉ. राजे म्हणाल्या, एडसूवर मात करण्यासाठी वैयक्तिक स्तरावर जनजागृती आवश्यक आहे. योग्य ती खबरदारी, सुरक्षा साधनांचा वापर केला पाहिजे. एचआयव्हीग्रस्तांना मानवाधिकारानुसार योग्य वागणूक द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. समुपदेशक सुरेखा जाधव यांनी जाणीवजागृतीची शपथ दिली. आभार कॅप्टन सुनीता भोसले यांनी मानले. प्रा. लेप्टनंट जे. आर. भरमगोंडा यांनी सुत्रसंचालन केले. प्राचार्य एस. वाय. होनगेकर, विभागप्रमुख प्रा. किरण पाटील, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बगाडे, प्रा. बी. एस. लाड. प्रा. बी. के. गावीत आदी उपस्थित होते.

CLEANLINESS DRIVE



केसरी

सोमवार, २ डिसेंबर २०१९

# जारांवर मात करून आरोग्य चांगले राखा : डॉ. वैशाली राजे

प्रतिनिधी
व सामाजिक
ंगले राहण्यासाठी
रोगांवर मात करुन
ाने जगणे महत्त्वाचे
से मत कृष्णा
कराड येथील
विभागप्रमुख डॉ.
यांनी विवेकानंद
जागतिक एड्स
ानिमित्त आयोजित
बोलताना मांडले.
म्हणाल्या, एक
दिवस जागतिक
न दिन म्हणून
रा केला जातो.
एड्ससारख्या
मात करण्यासाठी
तळीवर जाणीव
आवश्यक असते.
खबरदारी, सुरक्षा
वापर,

विवेकानंद कॉलेजमध्ये एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या वतीने जागतिक एड्स निर्मूलन दिनी काढण्यात आलेली रॅली.

एच.आय.व्ही.ग्रस्त स्त्री पुरुषांना त्यांच्या मानवाधिकारापासून कोणी वंचित ठेवता कामा नये.

यानंतर उपस्थित एन.सी.सी. व एन.एस.एस. विद्यार्थ्यांना सुरेखा जाधव, समुपदेशक महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी यांनी एच.आय.व्ही. एड्स जाणीव जागृतीची शपथ दिली. यानंतर छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सी.पी.आर.) येथून नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन यांच्यामार्फत आयोजित एड्स जाणीव जागृती रॅलीत महाविद्यालयातील एन.सी.सी. व एन.एस.एस. विद्यार्थ सहभागी झाले. या रॅली उद्घाटन कोल्हापूर महानग पालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे हस्ते झाले महाविद्यालयातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक एन.सी.सी. विभाग प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले यांनी केल तर कार्यक्रमाचे आभार प्रा. लेफ्ट. जे. आर भरमगोंडा यांनी मानले. या कार्यक्रमास विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यक्रमास जिमखाना विभाग प्रमुख प्रा किरण पाटील, एनएसएस विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. बी. एस. लाड, प्रा बी के गावीत, प्राध्यापक, कर्मचारी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

HIV AIDS AWARENESS RALLY



पुढारी सोमवार, २ डिसेंबर २०१९

# शहरात एड्स जनजागृती रॅली उत्साहात

## जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकातर्फे आयोजन; एनसीसी छात्रांसह युवक-युवतींचा सहभाग

ोल्हापूर : प्रतिनिधी

जागतिक एड्स दिनानिमित्त सप्ताह निमित्ताने रविवारी हरातून जिल्हा एड्स प्रतिबंध व यंत्रण पथक, छत्रपती प्रमिलाराजे र्वोपचार रुग्णालय, जिल्हा ारोग्य विभाग यांच्या वतीने ड्स जनजागृती रॅली काढण्यात ाली. महापालिका आयुक्त ॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा रिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॉ. अमन मित्तल, जिल्हा ल्यचिकित्सक डॉ. बी. सी. केम्पी ाटील, अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी जभिये, अभिनेता आनंद काळे ांनी झेंडा दाखविल्यानंतर प्रभात रीला सुरुवात झाली.

रॅलीची सीपीआर येथून दसरा चौक, आईसाहेब महाराज पुतळा, बिंदू चौक, छत्रपती शिवाजी चौक, महापालिका चौक मार्गे सीपीआरच्या प्रांगणात समारोप झाला. रॅलीत 'एड्स जाणा, एड्स टाळा, पाव्हणं जरा जपून...एड्स आला लपून' अशा घोषणा आणि हातात प्रबोधनात्मक फलक रॅलीत होते. विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विभाग, सीपीआरच्या नर्सिंगच्या विद्यार्थिनी, अॅपेक्स नर्सिंग, जिल्हा क्रीडा कार्यालय खेळाडू, महावीर महाविद्यालय, महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अभिमान सामाजिक संघटना, लोटस मेडिकल फाऊंडेशन, संग्राम सामाजिक संघटना, युवा ग्रामीण संघटना, विवेकानंद नर्सिंग कॉलेज, के.एम.सी. कॉलेज, सायबर कॉलेज, रोटरॅक्ट व इनरव्हील क्लब आदींचा रॅलीत सहभाग होता. दरम्यान, हैदराबाद येथील डॉक्टर प्रियांका रेड्डी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, जनजागृती आणि प्रबोधनामुळेच जिल्ह्यातील एड्स रोग नियंत्रणात आला आहे. औषधाप्रमाणेच जनजागृतीचा डोस नागरिकांना महत्त्वाचा आहे.

डॉ. मित्तल म्हणाले, आरोग्य विभागाबरोबर, सामाजिक संघटना, तरुण मंडळे, शालेय विद्यार्थिनी एड्स जनजागृती चळवळ उभी करून ती यशस्वी केल्याने एड्स रोग नियंत्रणात आला आहे.

प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी दीपा शिपूरकर यांनी केले. डॉ. विलास देशमुख, डॉ. राजेश पवार, डॉ. हर्षला वेदक, डॉ. सुप्रिया देशमुख यांच्यासह सीपीआर, जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण पथकातील कर्मचारी उपस्थित होते.

कोल्हापूर : जागतिक एड्स दिनानिमित्त रविवारी एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी रॅलीस झेंडा दाखवून सुरुवात करताना आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, डॉ. मित्तल, डॉ. केम्पी पाटील, काळे, शिपूरकर आदी. (छाया : तय्यब अली)

HIV AIDS AWARENESS RALLY



तरुण भारत शुक्रवार, २४ जानेवारी २०२०

# रक्तदान शिबिरात ७६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून विवेकानंद कॉलेजमधील एन. सी. सी., एन. एन. एस विभाग आणि सीपीआर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीरात ७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. डी. बी. पाटील, जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील, कला व वाणिज्य शाखेच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

रक्तदान शिबीरासाठी एनएसएस प्रमुख प्रा. एच. पी. पाटील, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनिता भोसले, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे सहित एनसीसी व एनएसएस यांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबीरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल हरूगडे, डॉ. अर्पित, अधिपरिचारक दत्ता ऐवळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ रमेश सावंत, राजू नडगिरे, सहायक रोहित गोरे, हर्षवर्धन पटवर्धन, प्रणित मिसाळ, मिनल पाटील, समुपदेशक सुरेखा माने यांचे सहकार्य लाभले.

BLOOD DONATION



पुढारी कोल्हापूर, सोमवार, १७ फेब्रुवारी २०२०

# महत्त्वाकांक्षेस क्षमतेची जोड देऊन यशस्वी व्हावे : सरनाईक

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सकारात्मक विचारांना प्रयत्न व कृतीची जोड असेल तर जीवनात यशस्वी होणे शक्य आहे, असे प्रतिपादन लेफ्टनंट कर्नल संजीव सरनाईक यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. लेफ्टनंट कर्नल सरनाईक म्हणाले, महाविद्यालयीन जीवनात एनसीसी विभागातून मिळालेली शिस्त, वक्तशीरपणा, सहकारी भावना देशभक्ती यामुळे संरक्षण क्षेत्रात जाण्याची महत्त्वाकांक्षा तयार झाली.

आपल्यातील क्षमता व महत्त्वाकांक्षा यांचा मेळ घालून कष्ट करावे. स्वागत संकेत बागणीकर यांनी केले. सूत्रसंचालन कॅडेट प्रिया बुराण यांनी केले. केतकी सहस्रबुद्धे यांनी आभार मानले. यावेळी एनसीसी अधिकारी कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमागोंडा, प्रा. एस. एम. रुईकर यांच्यासह शंभरहून अधिक एनसीसी छात्र उपस्थित होते.

OPPORTUNITIES IN INDIAN ARMY




पुण्य नगरी

शनिवार, १५ फेब्रुवारी २०२०

# विवेकानंद महाविद्यालय येथे प्रात्यक्षिक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** महापालिका अग्निशमन दलाच्या वतीने अग्निशमन, तसेच आणीबाणीच्या वेळी शोध, बचाव आणि सुटका याचे प्रात्यक्षिक विवेकानंद कॉलेज येथे घेण्यात आले. हे प्रशिक्षण मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले यांच्या मार्गदर्शनाखाली स्टेशन ऑफिसर मनीष रणभिसे, वाहनचालक संदीप व्हनाळकर, तांडेल … चौरे, फायरमन मेहबूब जमादार, … दिले. यावेळी विवेकानंद … संख्येने

DISASTER MANAGEMENT



पुण्य नगरी

मंगळवार, २६ जानेवारी २०२१

## रामचंद्र चव्हाण यांची निवड

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजमधील सिनिअर अंडर ऑफिसर रामचंद्र अशोक चव्हाण यांची २६ जानेवारी रोजी राजपथ दिल्ली येथे होणाऱ्या ७२ व्या भारतीय प्रजासत्ताक दिन संचालनाकरिता निवड झालेली आहे. सप्टेंबर २०२० पासून ते आजपर्यंत कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सतर्कता व काळजी घेऊन कोल्हापूर, पुणे व दिल्ली येथील प्रत्येक चाळणी शिबिरातून या कॅडेटची निवड झालेली आहे. महाराष्ट्र एनसीसी डायरेक्टरेटकडून या कॅडेटची निवड बेस्ट कॅडेट म्हणून अखिल भारतीय स्तरावरील सतरा एनसीसी डायरेक्टरेटअंतर्गत होणाऱ्या ऑल ओव्हर बेस्ट स्पर्धेसाठी झाली आहे. या निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

27.1.2021.

लोकमत

epaper.lokmat.com

मंगळवार, दि. २६ जानेवारी २०२१

## रामचंद्र चव्हाण याची संचलनासाठी निवड

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमधील सिनिअर अंडर ऑफिसर रामचंद्र अशोक चव्हाण याची राजपथ दिल्ली येथे होणाऱ्या भारतीय प्रजासत्ताक दिन संचालनाकरिता निवड झाली आहे. कोल्हापूर, पुणे व दिल्ली येथील प्रत्येक चाचणी शिबिरातून या कॅडेटची निवड झाली. या निवडीबद्दल त्याचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. चव्हाण याला एनसीसी प्रमुख लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले, फाइव्ह महाराष्ट्र बटालियनचे कमांडिग ऑफिसर कर्नल आर.बी. होला, सेना ॲडम. ऑफिसर लेफ्टनंट कर्नल किशोरकुमार मोरे, सुभेदार मेजर ठिकपुर्ले यांच्यासह पालकांचे मार्गदर्शन लाभले.

REPUBLIC DAY DEHLI



**तरुण भारत** शनिवार, ४ जानेवारी २०२०

# बॉम्बशोधक-नाशक, श्वान पथकांचे प्रात्यक्षिके

प्रतिनिधी
कोल्हापूर

पोलीस पाटील व खासगी सुरक्षा एजन्सी मालक आणि सुरक्षा रक्षकांना पोलीस दलाकडील सुरक्षा पथकांच्या कार्यपद्धतीचे आकलन व्हावे. याकरिता त्यांना पोलीस कवायत मैदानावर शुक्रवारी बॉम्बशोधक व नाशकपथक, गुन्हे श्वानपथक, जलद कृतीदल पथकांनी कार्यपद्धतीची माहिती देऊन विविध प्रात्यक्षिके सादर केली. समारंभाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र पोलीस वर्धापनदिन सप्ताह निमित्ताने जिल्हा पोलीस दलाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून सुमारे एक हजार पोलीस पाटील व सुमारे ८० खासगी सुरक्षा एजन्सी मालक आणि सुरक्षा रक्षकांनी हजेरी लावली होती. या कार्यक्रमात वर्षभरात चांगली कामगिरी केल्याबद्दल २४ पुरुष व ५ महिला पोलीस पाटील यांना पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्वागत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक तानाजी सावंत यांनी केले. पोलीस मुख्यालयामध्ये जिल्हा पोलीस दलाने 'पोलीस रेझिंग डे' निमित्ताने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांविषयी माहिती, पोलीस दलातील शस्त्रांविषयी माहिती देण्यात आली. यामध्ये कसबा बावडा येथील छत्रपती राजाराम विद्यालय, देशमुख इंग्लिश मीडियम स्कूल, डीकेव्हीएनएस स्कूल उचगाव, कमला कॉलेज, विवेकानंद कॉलेज आणि एनसीसी कॅडेट्सच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे, प्रशिक्षणार्थी अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक पद्मा कदम, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक वसंत बाबर, प्रशिक्षणार्थी अपर पोलीस अधीक्षक अविनाशकुमार, महाराष्ट्र पोलीस पाटील संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भिकाजी पाटील, जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव मोरे, खासगी सुरक्षा रक्षक एजन्सी असो.चे जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब सांगले आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर : पोलीस मुख्यालयात विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व पालनाविषयी माहिती देण्यात आली.**

STATE POLICE RAISING DAY



पुण्य नगरी

शुक्रवार, २४ एप्रिल २०२० । कोल्हापूर

# लेफ्टनंट कर्नलपदी सिद्धार्थ मंडलिक

कागल : प्रतिनिधी

कोल्हापूरच्या कॅप्टन दिनकरराव गणपतराव मंडलिक यांच्या घराण्यातील सिद्धार्थ दिलीपसिंह मंडलिक यांची लेफ्टनंट कर्नलपदी निवड झाली.

सिद्धार्थ मंडलिक यांचे प्राथमिक शिक्षण दिल्ली व सेव्हन डेज ॲडव्हेंट्स स्कूल, कोल्हापूर येथे, माध्यमिक शिक्षण सह्याद्री हायस्कूल, राजगुरूनगर येथे तर विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथून त्यांनी बी. कॉम. पदवी घेतली. त्यांना एनसीसीमध्ये बेस्ट कॅडेट हा सन्मान मिळाला होता. कॉलेज शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते लष्करी सेवेत दाखल झाले. '३ मेकॅनाईस इनफॅनटरी' जम्मू काश्मीरमध्ये 'राष्ट्र रायफल'मध्ये त्यांनी सेवा बजावली आहे. युनायटेड नेशन्स कांगो येथे यु. एन ऑब्झर्व्हर म्हणून सेवा बजावली आहे. सिद्धार्थ मंडलिक यांचे वडील कर्नल दिलीपसिंह मंडलिक हे लष्करी सेवेतून निवृत्त झाले आहेत. आई मोहिनी मंडलिक, पत्नी पूजा मंडलिक, कन्या, तीन बहिणी, या सर्वांच्या पाठबळामुळेच यश मिळवता आले, अशी त्यांनी प्रतिक्रिया दिली.

PROMOTION ON LT COLONEL